# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे ४११००७

**Savitribai Phule Pune University**

**Ganeshkhind, Pune - 411007**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : 020-25621205
**Telephone No.:** 020-25621205
**Email:pgadmis@pun.unipune.ac.in**

शैक्षणिक प्रवेश विभाग
**P.G. Admission Section**
**Website: www.unipune.ac.in**


---

परिपत्रक क्र. ६५/२०२६

## "विद्यापीठ विभागामधील विद्यार्थ्यांकरीता"

विषय : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक विभागातून शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९ पूर्वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारे स्थलांतर प्रमाणपत्र **(Transfer Certificate)** ऑनलाईन पध्दतीने कार्यवाही करणेबाबत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक विभागामध्ये ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९ पूर्वी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे, त्यांचे स्थलांतर प्रमाणपत्र **(Transfer Certificate)** शैक्षणिक प्रवेश विभागामार्फत विद्यार्थ्यांना अर्ज केल्यानुसार दिले जाते. ही सर्व प्रक्रिया करत असताना विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष येऊन अर्ज भरून द्यावा लागतो, त्यानंतर बँकेत जाऊन चलन भरावे लागते तसेच ग्रंथालय विभाग, वसतिगृह कार्यालय व संबंधित शैक्षणिक विभाग यांचेकडून ना—देय प्रमाणपत्र **(No Dues Certificate)** सही व शिक्का घेऊन शैक्षणिक प्रवेश विभागामध्ये अर्ज जमा केल्यानंतर संबंधित विद्यार्थ्याला स्थलांतर प्रमाणपत्र **(Transfer Certificate)** निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही केली जाते. यामध्ये विद्यार्थ्यांच्या वेळेचा अपव्यव होतो.

सबब, ही सर्व प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने विहीत केली असून सर्व संबंधित विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, जे विद्यार्थी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक विभागातून शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९ पूर्वी उत्तीर्ण झालेले आहेत व अद्यापपर्यंत स्थलांतर प्रमाणपत्र **(Transfer Certificate)** घेतलेले नाही, अशा विद्यार्थ्यांनी आवश्यकता असल्यास स्थलांतर प्रमाणपत्र **(Transfer Certificate)** मिळण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करून सोबत जोडलेल्या कार्यपध्दती **(User Manual)** नुसार कार्यवाही करावी.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ:शै.प्रवेश /११८१ )
दिनांक : १६/०५/२०२६)

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ. } आपणांस विनंती की, वरील परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

वित्त व लेखा विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 25 SEP 2025
टिपणी क्रमांक वित्त 337
जावक दिनांक 26/09/25

मा. कुलसचिव यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
टिपणी क्रमांक आर/ 4644
आवक दिनांक 27-9-25
जावक दिनांक 27-9-25

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 28 SEP 2025
टिपणी क्रमांक व्हीसी 4226
जावक दिनांक 28 SEP 2025

शैक्षणिक प्रवेश विभाग
प्रस्तुत विद्यापीठ
संदर्भ क्र. शै प्रवेश/ 244
दिनांक : 24/09/2025

**विषय : शैक्षणिक प्रवेश विभागाकडून निर्गमित करण्यात येणारे स्थलांतर प्रमाणपत्र (T.C.) प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने करणे, विद्यार्थ्यांच्या मागनीनुसार स्थलांतर प्रमाणपत्र (T.C.) देणे व सदर प्रमाणपत्राकरिता शुल्क वाढविणेबाबत....**

सादर :

शैक्षणिक प्रवेश विभागाकडून २०१९ पूर्वी विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक विभागात प्रवेशित पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी अथवा नोकरी लागली असल्यास स्थलांतर प्रमाणपत्र (T.C.) देण्याबाबतची कार्यवाही रु २००/— व T.C. for migration रु २००/— असे एकूण रु ४००/— इतके शुल्क चलणाद्वारे आकारण्यात येते. सदर प्रक्रिया पूर्ण करतांना ऑफलाईन पध्दतीने भरलेला अर्ज, विद्यार्थ्यांची संबंधित कागदपत्रे, ऑफलाईन शुल्क भरल्याची पावती विद्यार्थ्यांनां प्रत्यक्ष येऊन जमा करावी लागते त्यासोबत त्या विद्यार्थ्यांचे वसविगृह कार्यालय, संबंधित विद्यापीठ विभाग व जयकर ग्रंथालय यांचेकडून No Dues जमा करुन घेतले जातात.

सदर विद्यार्थ्यांना स्थलांतर (T.C.) प्रमाणपत्रासाठी अर्ज भरतांना त्यांनी कुठे प्रवेश घेतला आहे. याबाबतची कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे. यामध्ये काही विद्यार्थ्यांना कुठेही प्रवेश घ्यावयाचा नसतो, परंतु त्यांच्या महत्वाच्या कामासाठी अथवा स्वत:चे शिक्षण पूर्ण झाले असल्याने व स्वत:ची कागदपत्रे हवी असल्याकारणाने त्यांना स्थलांतर प्रमाणपत्राची आवश्यकता असते.

विद्यार्थ्यांचा वेळ व पैश्याची बचत होण्याच्या तसेच कार्यालयीन कामकाज सुरळीत होण्याच्या दृष्टीकोनातून खालीलप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे.

१) ही सर्व प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने विहीत करण्यास मान्यता.
२) सदर प्रमाणपत्रासाठी सध्या आकारण्यात येणारे प्रत्येकी रु. २००/— इतके शुल्क हे वाढलेला प्रशासकीय खर्च विचारात घेऊन रु ३००/— इतके शुल्क आकारण्यास मान्यता.
३) विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने स्थलांतर प्रमाणपत्र (T.C.) त्यांच्या Login मध्ये उपलब्ध करुन देण्यास मान्यता.

सध्या प्रचलित ठेवण्यात यावे

उपरोक्त बाबीस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. वित व लेखा अधिकारी, मा. कुलसचिव, मा. प्र—कुलगुरू यांचेमार्फत मा. कुलगुरू यांचेकडे सादर.

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

(सीएमए (डॉ.) चारूशीला गायके)
मा. वित्त व लेखा अधिकारी

(प्रा. डॉ. ज्योती भाकरे)
मा. प्रभारी कुलसचिव

(प्रा. डॉ. पराग काळकर)
मा. प्र—कुलगुरू

(प्रा. डॉ. सुरेश गोसावी)
मा. कुलगुरू

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## वित्त व लेखा विभाग

फोन : २५६२१२४४/४५

ई-मेल: fao@unipune.ac.in

नवीन प्रशासन भवन, सावित्रीबाई फुले पुणेविद्यापीठ, गणेशखिंड, पुणे-४११ ००७.


जा.क्र:वित्त/बुक/२०२६—२७/२३८

दिनांक ०९/०४/२०२६

प्रति,

**मा. उपकुलसचिव,**
शैक्षणिक प्रवेश विभाग,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
पुणे ७.

Ph.D./M.Phil Uni. 2070
Inward No.
Date : 10/04/26

**विषय** :— एम.एल.सी. कोड देण्याबाबत..

**संदर्भ** :— शै.प्रवेश/१०६४ दि. ०७/०४/२०२६

महोदय,

वरील संदर्भीय पत्रानुसार आपणांस कळविण्यात येते की, आपल्या विभागामार्फत प्रवेशित विद्यार्थ्याची हस्तांतरण प्रमाणपत्र शुल्क ऑनलाइन स्वरूपात जमा करण्यासाठी खालील नमुद केल्याप्रमाणे एम.एल.सी.कोड देण्यात येत आहेत. तक्यानुसार नमुद केलेले एम.एल.सी. कोड,चलन नंबर व विभाग क्रमांक सी.आय.एन.एस. विभागाला आपल्या विभागामार्फत कळविण्यात यावे. जेणेकरून ऑनलाईन प्रणाली करणे सोयीचे होईल.

| Sr.No | Particular Name | M.L.C Code No. |
|---|---|---|
| 1 | TRANSFERENCE CERTIFICATE(T.C.) | 111005 |
| 2 | Challan No | 87 |
| 3 | Department No | 40 |

कळावे,

वित्त व लेखा अधिकारी
वित्त व लेखा विभाग